R.No. MHHMAR/25/A3029

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ५२

दि.०४ फेब्रुवारी २०२६,वार: बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## भाजपच्या भ्रष्टाचाराचा कासरा आवळण्याची हीच ती योग्य वेळ - लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख

निलंगा : लातूर जिल्हा परिषद भाजपच्या ताब्यात असताना जिल्ह्यात कोणतेही ठोस विकासकाम झाले नसून अनेक विकास योजना केवळ कागदावरच राबवण्यात आल्या. या योजनांमध्ये भाजप पदाधिकारी व त्यांच्या नेत्यांनी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचा आरोप लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष, काँग्रेस नेते धिरज विलासराव देशमुख यांनी केला.



निलंगा तालुक्यातील लांबोटा व शिरूर अनंतपाळ तालुक्यातील उजेड येथील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित काँग्रेस उमेदवारांच्या प्रचार सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी मतदारांनी आपल्या मताची ताकद ओळखावी, असे आवाहन केले.

रेल्वे बोगी कारखान्याच्या माध्यमातून स्थानिक बेरोजगार युवकांना नोकऱ्या दिल्या जातील, असे आश्वासन भाजपकडून देण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात एकाही युवकाला नोकरी मिळाली नाही यामुळे युवकांची फसवणूक भाजप कडून करण्यात आल्याचे धिरज देशमुख यांनी सांगितले.

याउलट लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच मांजरा परिवारातील साखर कारखान्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाला चालना दिली असून या माध्यमातून शेतकरी व शेतमजुरांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडून आले असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाजपच्या भ्रष्टाचाराचा कासरा आवळण्यासाठी हीच योग्य वेळ असून येत्या ७ तारखेला काँग्रेसच्या 'हात' चिन्हाला साथ देण्याचे आवाहन धिरज विलासराव देशमुख यांनी मतदारांना केले.

यावेळी काँग्रेसचे नेते अशोकराव पाटील निलंगेकर, जिल्हा अध्यक्ष अभय साळुंखे यांच्या सह काँग्रेस उमेदवार, पदाधिकारी, कार्यकर्ते व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन यशवंतराव चव्हाण रुग्णालयात विविध उपक्रमातून साजरा

लातूर - थोर शिक्षणतज्ञ, विचारवंत आणि विश्वशांतीचे प्रणेते एमआयटी पुणे या शिक्षण संकुलाचे संस्थापक प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड यांचा जन्मदिन लातूर येथील एमआयटीच्या वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय येथे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विविध उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित रक्तदान शिबिरात ८६ जणांनी रक्तदान केले तर रुग्णालयातील विविध विभागाच्या वतीने सर्व रुग्णांसाठी मोफत तपासणी करण्यात आली.





गोरगरीब आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेले, शून्यातून विश्व निर्माण करणारे त्याचबरोबर अध्यात्म आणि विज्ञान यांच्या संगमातून मानवी कल्याणासाठी कार्य करणारे एमआयटी शिक्षण समूह पुणे आणि विश्वशांती केंद्र आळंदी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचा ३ फेब्रुवारी रोजी जन्मदिन. यानिमित्ताने लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक आ. रमेशआप्पा कराड आणि परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या मार्गदर्शनाखाली लातूर येथील एमआयटीच्या यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय येथे श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यात ८६ जणांनी रक्तदान केले. रुग्णालयातील सर्व प्रकारच्या रुग्णांना यावेळी फळ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर विविध विभागाच्या वतीने रुग्णांची पूर्णपणे मोफत रक्तदाब व मधुमेह तपासणी शिबिर, महिलांच्या स्तन व गर्भाशय कॅन्सरबाबत रोग निदान व उपचार, नाक, कान, घसा विभागाच्या वतीने तोंडाच्या कर्करोगाची तपासणी, हाडाचा ठिसूळपणा तपासणी, थॅलेसेमिया रुग्णांची सिरम फेरेटीन तपासणी, रुग्णांची अस्थामा तपासणी, गॅस्ट्रोस्कोपी आणि एन्डोस्कोपी तपासणी करण्यात आली.

विश्वधर्मी मा. डॉ. वि. दा. कराड साहेब यांच्या जन्मदिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध विभागाच्या मोफत तपासणी शिबिराचे रुग्णालय अधीक्षक डॉ. चंद्रकला डावळे पाटील, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य एस. एस. सर्वानन, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, कार्यालय अधीक्षक भास्कर दहिफळे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. या शिबिराचा सर्व प्रकारच्या रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

विविध विभागातील तपासणी शिबिर कार्यक्रमात मेडिसिन विभाग प्रमुख डॉ. गजानन गोंधळी, स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. क्रांती केंद्रे, अस्थिरोग विभाग प्रमुख डॉ. अरुणकुमार राव, शल्यचिकित्सा विभाग प्रमुख डॉ. एन. व्ही. कुलकर्णी, बालरोग विभाग प्रमुख डॉ. विद्यादेवी कांदे, नाक, कान, घसा विभाग प्रमुख डॉ. श्याम सोमानी, यांच्यासह त्या त्या विभागातील डॉ. विशाल भालेराव, डॉ. सचिन बाबळसुरे, डॉ. शरद सोनवणे, डॉ. स्तुती उगिले, डॉ. अमर लिंबापुरे, डॉ. नीला भट्टड, डॉ. रोशनी आकुसकर, डॉ. प्रीती, डॉ. अबेद नागुरे, डॉ. मधुरा वाघमारे, डॉ. बसवराज वारद, डॉ. रवींद्र इरपतगिरे, डॉ. अभिजीत रायते, डॉ. नंदकिशोर शिंदे, डॉ. नितीन सर्जे, डॉ. द्वारकादास तापडिया, डॉ. गीतकुमार हाजगुडे, डॉ. उद्धव शेळके, डॉ. रोहन पाटील, डॉ. शिल्पा कुदरीकर, डॉ. दीपिका माशाळकर, डॉ. शुभम डाके, डॉ. शुभम कालेढेले, डॉ. शैला बांगड, डॉ. शितल शेळके, डॉ. सुरेखा भालेराव, डॉ. शिल्पा गर्जे, डॉ. योगेश गावसाने, डॉ. अनिलकुमार जाधव यांनी मेहनत घेतली. दिवसभर विविध विभागात रूग्णांची मोठी गर्दी होती.

## अज्ञान की शक्ती क्रोध मे हैं औंर ज्ञान की शक्ती मौंन मे हैं..! - समाजभूषण उत्तमराव तरकसे

मुंबई:- पूर्वीचे बुंदेलखंड राज्याची राजधानी म्हणून ओळखले जाणारे शहर व मेरी झांसी नही दूंगी , असे ब्रिटिश सरकारला ठणकावणारया विरंगणा राणी लक्ष्मीबाईच्या घोषणेतील झांसीचा ३१ जानेवारी हा झाशी दिवस म्हणून काही वर्षापासून झाशीचे नगरवासीय ३१जानेवारी हा झांसी दिवस म्हणून साजरा करत आहेत सदर ३१जानेवारी २०२६च्या झांसी दिनानिमित्त मानव विकास संस्था झांसी व गोयंका पब्लिक स्कूल झांसी यांच्या संयुक्त विद्यमाने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन झांसीच्या किल्लयावरतीच करण्यात आले होते.



सदर कार्यक्रमात मा श्री उत्तमराव दासू तरकसे आसरडोहकर (महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक विचारवंत) यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सदर संस्था व हायस्कूलच्या वतीने निमंत्रित करण्यात आल्याने सदर संस्थेच्या आग्रहास्तव निमंत्रण स्वीकारून श्री उत्तम तरकसे हे कार्यक्रमास उपस्थित राहून आपल्या मनोगतात प्रबोधनात्मक विचार हिंदी बोली भाषेत मांडताना श्री तरकसे म्हणाले की

कोई सरहाना करे या निंदा<br>लाभ तुम्हारा ही है,<br>क्यूकी ..!<br>प्रशंसा प्रेरणा देती है और निंदा सुधारने का अवसर..!<br>ऐसा ही<br>अज्ञान की शक्ती क्रोध है और ज्ञान की शक्ती मोन है

असे प्रबोधनात्मक विचार मांडत मानव विकास संस्थेच्या सर्व पदाधिकारी व खास करून मा श्री अभय अग्रवाल यांचे व श्री गोयंका पब्लिक स्कूलचे प्राचार्य मा प्रयांशु श्रीवास्तव व त्यांच्या सर्व शिक्षक प्राध्यापक व शिक्षक इतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे त्यांना आग्रहाने कार्यक्रमाला बोलून त्यांच्या सन्मान करून त्यांचे विचार ऐकल्याबद्दल सर्वांचे आभार मानले तसेच सौ ताई रुपणार व श्री अरुण खांजोडे यांचे सुद्धा आभार मानले

अभय अग्रवाल व प्रियांशू श्रीवास्तव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली

## पत्रकारिता, आणि समाजकार्याचा मानबिंदू पुरस्काराने : लक्ष्मीकांत पोपळे सन्मानित..!

ठाणे /प्रतिनिधी :-पत्रकारिता, प्रभावी निवेदन, चित्रपट निर्मिती-दिग्दर्शन तसेच सामाजिक कार्य या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल श्री. लक्ष्मीकांत पोपळे यांचा कोतुक सन्मान रविवारी दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी ठाणे येथे संपन्न झालेल्या एशियन युथ इमेज पुरस्कार सन्मान सोहळा २०२६

(ीळरप ्रीेंह ळारसश उेपषशीशपलश ुरीव उशीशोपू २०२६) या भव्य कार्यक्रमात करण्यात आला.



इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स (खखजठउ मान्यताप्राप्त) संस्थेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून निवडलेल्या १३० मान्यवरांचा गौरव करण्यात आला. त्यामध्ये पत्रकारिता व माध्यम क्षेत्रात सकारात्मक विचार मांडणारे, प्रभावी निवेदक म्हणून कार्यक्रमांना सुसंस्कृत दिशा देणारे, तसेच चित्रपट निर्मिती व दिग्दर्शनातून सामाजिक आशय अधोरेखित करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून श्री. पोपळे यांच्या कार्याची विशेष दखल घेण्यात आली.

सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य सातत्याने करत असलेल्या श्री. लक्ष्मीकांत पोपळे यांचा हा सन्मान तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. या सन्मान सोहळ्यास प्रशासकीय अधिकारी, मान्यवर पाहुणे, पुरस्कारार्थी, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री. पोपळे यांच्या कार्याचा झालेला हा गौरव माध्यम व सामाजिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद ठरला आहे.



नेरूळ पोलिस ठाणे *वरिष्ठ पोलीस निरीक्षक : अजय कांबळे यांना स्वातंत्र्य भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून *२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी भारतीय संविधान* ग्रंथ भेट देऊन हार्दिक शुभेच्छा दिल्या, त्यावेळी वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हा महासचिव : सुनील भोले, उपाध्यक्ष गौतम चव्हाण, वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई महिला महासचिव : साक्षीताई लोटे, महिला उपाध्यक्ष : ज्योतीताई उबाळे, बेलापूर तालुका उपाध्यक्ष : सुभाष बलखंडे, बेलापुर तालुका मा. उपाध्यक्ष कल्याणराव हनवते आणि वंचित चे श्रीकांत वावरे उपस्थित होते.

## संपादकीय...

# ब्लॅक बॉक्स : विज्ञानाचा चमत्कार

विज्ञानाने मानवाला अनेक अद्भुत साधने दिली, पण काही शोध असे असतात की जे संकटाच्या क्षणी मानवतेचे रक्षण करतात आणि सत्याचा शोध लावतात. विमान अपघातानंतरही नष्ट न होणारा आणि घटनेचे संपूर्ण सत्य उघड करणारा ब्लॅक बॉक्स हा विज्ञानाचा असाच एक विलक्षण चमत्कार आहे. जिथे मानवी साक्ष अपुरी ठरते, जिथे प्रत्यक्षदर्शी नसतात, तिथे ब्लॅक बॉक्स निःपक्षपाती साक्षीदार बनतो.

नावातच गैरसमज : ब्लॅक बॉक्स काळा नसतो

ब्लॅक बॉक्स हे नाव जरी गूढ वाटत असले, तरी प्रत्यक्षात तो काळ्या रंगाचा नसून तेजस्वी केशरी किंवा लाल रंगाचा असतो. अपघातानंतर ढिगाऱ्यातून तो पटकन सापडावा, हा त्यामागचा उद्देश आहे. नाव ‘ब्लॅक बॉक्स’ राहण्याचे कारण म्हणजे आत काय घडते, हे सुरुवातीला मानवाला माहीत नव्हते; म्हणजेच तो एक ब्लॅक सिस्टम होता.

ब्लॅक बॉक्सची रचना : विज्ञान आणि अभियांत्रिकीचा संगम

ब्लॅक बॉक्समध्ये दोन अत्यंत महत्त्वाचे घटक असतात

फ्लाइट डेटा रेकॉर्डर (ऋऊठ)

कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर (उतठ)

ऋऊठ विमानाशी संबंधित शेकडो तांत्रिक घटकांची नोंद ठेवतो वेग, उंची, दिशा, इंजिनचा दबाव, इंधन वापर, ब्रेक प्रणाली, नियंत्रण यंत्रणा.

उतठ कॉकपिटमधील प्रत्येक शब्द, इशारा, अलार्म आणि वैमानिकांमधील शेवटचा संवाद नोंदवतो.

ही नोंद सेकंदागणिक, अखंडपणे आणि स्वयंचलितपणे होत राहते.

अतिशय कठीण परिस्थितीतही टिकणारे यंत्र

ब्लॅक बॉक्स हे साधे उपकरण नाही; ते अत्यंत कठोर वैज्ञानिक चाचण्यांमधून पास झालेले यंत्र आहे.

तो पुढील गोष्टी सहन करू शकतो

११०० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान

प्रचंड स्फोटांचा दाब

हजारो मीटर खोल समुद्रातील दाब

अनेक दिवस पाण्यात राहणे

भीषण धक्के आणि आग

समुद्रात कोसळल्यास त्यामध्ये अंडरवॉटर लोकेटर बीकन असतो, जो ३० ते ९० दिवस सतत सिग्नल पाठवत राहतो. हे वैशिष्ट्य म्हणजे विज्ञानाचा अद्वितीय चमत्कारच आहे.

अपघात चौकशीतील केंद्रबिंदू

विमान अपघातानंतर चौकशी सुरू झाली की सर्वप्रथम प्रश्न असतो ब्लॅक बॉक्स सापडला का?

कारण ब्लॅक बॉक्सशिवाय चौकशी म्हणजे अंदाजावर आधारित निष्कर्ष.

ब्लॅक बॉक्सच्या माहितीवरून हे ठरवले जाते

अपघात मानवी चुकीमुळे झाला का?

तांत्रिक बिघाड कारणीभूत होता का?

हवामानाची भूमिका काय होती?

व्यवस्थात्मक त्रुटी होत्या का?

दोष शोधण्यासाठी नव्हे, तर भविष्यासाठी

ब्लॅक बॉक्सचा उद्देश दोषारोप करणे नाही, तर भविष्यातील जीव वाचवणे हा आहे.

त्यातून मिळालेल्या माहितीतून

विमान रचना सुधारली जाते

प्रशिक्षण पद्धती बदलल्या जातात

नवीन सुरक्षा नियम तयार होतात

आज विमान प्रवास सुरक्षित वाटतो, यामागे ब्लॅक बॉक्समधून शिकलेले धडे आहेत.

नैतिकता आणि गोपनीयतेचा प्रश्न

ब्लॅक बॉक्समध्ये वैमानिकांचे शेवटचे क्षण साठलेले असतात. त्यामुळे ती माहिती प्रसारित करताना मानवी संवेदना, कुटुंबीयांचा सन्मान आणि गोपनीयता जपणे अत्यावश्यक आहे. चौकशी पूर्ण होण्याआधी माहिती बाहेर जाणे हे नैतिकदृष्ट्या अयोग्य ठरते.

भारत आणि ब्लॅक बॉक्स : आव्हाने आणि संधी

भारतामध्ये विमान अपघात चौकशीसाठी खइ कार्यरत आहे. मात्र अजूनही अनेकदा ब्लॅक बॉक्स विश्लेषणासाठी परदेशी तज्ज्ञांवर अवलंबून राहावे लागते.

ही परिस्थिती बदलून स्वदेशी अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे ही काळाची गरज आहे.

विज्ञान, सुरक्षा आणि उत्तरदायित्व

ब्लॅक बॉक्स हे केवळ वैज्ञानिक उपकरण नाही; ते लोकशाही उत्तरदायित्वाचे प्रतीक आहे. कोणत्याही दुर्घटनेनंतर सत्य लपवता येत नाही, कारण ब्लॅक बॉक्स बोलतो शांतपणे, पण ठामपणे.

निष्कर्ष

ब्लॅक बॉक्स म्हणजे विज्ञानाने मानवाला दिलेला असा चमत्कार आहे, जो मृत्यूनंतरही सत्य जपतो. तो अपघाताचे कारण सांगतो, दोष शोधतो आणि भविष्यातील जीव वाचवतो.

आजच्या विज्ञानयुगात ब्लॅक बॉक्स हे मानवाच्या बुद्धिमत्तेचे, जबाबदारीचे आणि सुरक्षिततेच्या कटिबद्धतेचे प्रतीक बनले आहे. तो जळतो नाही, बुडतो नाही आणि खोटं बोलत नाही म्हणूनच ब्लॅक बॉक्स हा विज्ञानाचा खरा चमत्कार आहे.

# माणसे जपायची असतात पण आपण माणसांनाच वापरतोय!

माणसे जपायची असतात आणि पैसा वापरायचा असतो; पण आज लोक पैसा जपतात आणि माणसे वापरतात. हे वाक्य केवळ तात्त्विक नाही, तर आजच्या समाजाचे अचूक एक्स-रे आहे. या एका ओळीत आपल्या सामाजिक अधः पतनाची, नात्यांच्या विघटनाची आणि मूल्यांच्या घसरणीची संपूर्ण कहाणी सामावलेली आहे. दुर्दैव इतकेच की, हे सत्य आपल्याला माहिती असूनही आपण त्याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहोत. आजचा काळ हा केवळ आर्थिक स्पर्धेचा नाही, तर मानवी मूल्यांवर चाललेल्या अदृश्य युद्धाचा काळ आहे. या युद्धात पैसा जिंकतो आहे आणि माणूस हरतो आहे. पैसा कधीच वाईट नव्हता. तो माणसाच्या गरजांसाठी निर्माण झालेला एक साधन होता पण साधन हळूहळू साध्य बनू लागले आणि साध्य असलेला माणूस उपयुक्ततेच्या निकषांवर तोलला जाऊ लागला. आज माणसाची किंमत त्याच्या संवेदनशीलतेवर नाही, तर त्याच्या आर्थिक क्षमतेवर ठरते. आज समाजात विचारले जाणारे प्रश्न बदलेले आहेत. तू कसा आहेस? यापेक्षा तू काय करतोस? किती कमावतोस? तुझा स्टेटस काय? हे प्रश्न महत्त्वाचे ठरले आहेत. या प्रश्नांमागे माणसाविषयीची आपुलकी नाही, तर त्याच्या उपयोगितेची चाचपणी आहे.

पूर्वी नाती भावनेवर उभी राहायची. आज ती व्यवहारावर टिकतात. आज प्रत्येक नात्यामागे एक अदृश्य अट असते जोपर्यंत उपयोग, तोपर्यंत संबंध. मित्र तेव्हाच जवळचा, जोपर्यंत तो कामाचा आहे. नातेवाईक तेव्हाच आपले, जोपर्यंत त्यांच्याकडून काही मिळणार आहे. कार्यकर्ता तोपर्यंत महत्त्वाचा, जोपर्यंत तो मतांमध्ये रूपांतरित होतो. कर्मचारी तोपर्यंत हवासा, जोपर्यंत तो ‘प्रॉफिटेबल’ आहे. आज माणूस माणूस म्हणून स्वीकारला जात नाही; तो गुंतवणूक म्हणून पाहिला जातो. जिथे ‘रिटर्न’ नाही, तिथे संबंध संपवायला कोणालाही अपराधीपणा वाटत नाही. ही मानसिकता केवळ अमानवी नाही, तर समाजघातकी आहे. महानगरे विस्तारत आहेत. उंच इमारती उभ्या राहत आहेत. स्मार्ट सिटी, स्मार्ट रोड, स्मार्ट लाईफ सगळं काही ‘स्मार्ट’ होत आहे. पण या स्मार्टपणात माणूस मात्र एकटा पडतो आहे. एकाच इमारतीत राहणारी माणसं एकमेकांना ओळखत नाहीत.

शेजाऱ्याचा मृत्यू मोबाईल नोटिफिकेशनद्वारे कळतो. दुःखाला वेळ नाही, संवादाला उसंत नाही, माणसाला थांबवायला कोणी नाही. संपर्क वाढले आहेत, पण संवाद संपले आहेत. नेटवर्किंग वाढले आहे, पण नाती तुटली आहेत. कारण वेळ जपायचा असतो माणसांसाठी नाही, तर पैशासाठी. कुटुंब ही माणूस जपण्याची पहिली शाळा असते. पण आज तिथेही व्यवहार शिरकाव करू लागला आहे. वृद्ध आई-वडील जबाबदारी वाटू लागतात. मुलं इन्व्हेस्टमेंट ठरतात. लग्न हे नातं न राहता ‘सेटलमेंट’ बनते. आज प्रश्न असा उरलेला नाही की आपण कुटुंबासाठी काय करतो, तर प्रश्न आहे, आपल्याला त्यातून काय मिळतं? ज्या दिवशी नात्यांमधून अपेक्षा वाढतात आणि समजूत कमी होते, त्या दिवशी कुटुंब कोसळायला सुरुवात होते.

आजच्या आर्थिक व्यवस्थेत माणूस आकड्यात बदलला आहे. कामगार म्हणजे ‘कॉस्ट’. शेतकरी म्हणजे ‘डेटा’. रुग्ण म्हणजे ‘केस’. विद्यार्थी म्हणजे ‘फीस’. माणसाच्या वेदना, त्याचा संघर्ष, त्याची कथा या सगळ्याला व्यवस्थेत स्थान नाही. कारण त्यातून थेट नफा मिळत नाही. आपण विकासाच्या नावाखाली व्यवस्था उभी करतो, पण त्या व्यवस्थेत माणूस बसतच नाही आणि मग प्रश्न पडतो, हा विकास नेमका कोणासाठी? राजकारणात माणूस मतदार असतो. निवडणुकीच्या काळात त्याच्यासाठी घोषणांचा पाऊस पडतो. आश्वासनांची खैरात होते. पण निकाल लागल्यानंतर तो पुन्हा विसरला जातो. लोकप्रतिनिधी जपले जातात, सत्ता जपली जाते, निधी जपला जातो पण माणूस मात्र वापरला जातो. लोकशाहीचा आत्मा माणसात असतो, पण आज लोकशाही केवळ आकड्यांमध्ये उरली आहे. आज वापरणे ही सवय झाली आहे, नात्यांचा वापर, भावनांचा वापर, माणसांचा वापर. जो माणूस प्रश्न विचारतो, तो त्रासदायक ठरतो. जो झुकतो, तो उपयुक्त ठरतो. ही संस्कृती माणसाला गप्प बनवते, संवेदनांना बोथट करते आणि समाजाला निर्दयी बनवते आणि शेवटी, हाच समाज एकाकी, अस्वस्थ आणि हिंसक बनतो. पैसा साठवता येतो, पैसा वारसा देता येतो, पैसा बँकेत सुरक्षित ठेवता येतो, पण माणूस? तो जपला नाही, तर निघून जातो आणि तो गेला, की परत येत नाही.

आयुष्याच्या शेवटी पैसा उपयोगी पडत नाही. तेव्हा आठवण येते ती माणसांची, ज्यांना आपण वेळ दिला नाही, जपलं नाही, समजून घेतलं नाही. वेळ आहे, दिशा बदलण्याची, आजही वेळ गेलेली नाही पण त्यासाठी आत्मपरीक्षण गरजेचं आहे. आपण पैसा जपतोय की माणसं, याचा विचार करायला हवा. पैसा वापरायला शिका शिक्षणासाठी, आरोग्यासाठी, समाजासाठी पण माणसं जपा, कारण समाज माणसांवर उभा असतो, नफ्यावर नाही. जर आपण आजही माणसांपेक्षा पैशाला महत्त्व देत राहिलो, तर उद्या आपल्या भोवती सर्व काही असेल. घर, गाडी, संपत्ती पण कोणीच आपलं नसेल. कारण पैसा साथ देत नाही. तो फक्त साक्षीदार असतो आपल्या अपयशाचा. म्हणून माणसे जपायची असतात कारण शेवटी माणूसच माणसाच्या कामी येतो.

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

# ईपीएस- ९५ पेन्शनचा मुद्दा हाताळण्यास सरकार असमर्थ असेल; तर सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी.

वाढती महागाई,वाढता भ्रष्टाचार,वाढता औषधोपचार आणि वाढत्या प्रदूषणामुळे ढासळते आरोग्य यांनी ईपीएस-९५ पेंशन धारक अत्यंत त्रासलेला आहे.कारण अल्पशा पेंशनमध्ये पेन्शन धारक कोणतेही काम पूर्ण करूच शकत नाही.यावर सरकारने कानांवर हात ठेवले आहे व तोंडावर बोट ठेवले आहे यावरून स्पष्ट होते की, सरकारला ईपीएस ९५ पेंशन धारकांशी काहीही देणेघेणे नाही. त्यामुळे सरकारला विनंती आहे की,आपण जर या गंभीर समस्येवर तोडगा काढूच शकत नसेल तर स्वेच्छा मरणाची परवानगी दिली पाहिजे.याचे स्वागत आम्ही करू. गेल्या १२ वर्षांपासून ईपीएस पेंशन धारक मिनिमम (कमीत कमी) पेंशनची मागणी करीत आहे.या उद्देशाने कमीत कमी जगण्याइतकी तरी पेन्शन जाहीर करावी अशी पेंशनधारकांची केंद्र सरकारकडे अनेक वर्षांपासून मागणी करीत आहे.यावर लोकसभेत व राज्यसभेत अनेक खासदारांनी प्रश्न सुध्दा उपस्थित केले.सोबतच देशातील अनेक संघटनांनी मंत्री , खासदार,आमदार यांना निवेदनाच्या माध्यमातून सरकारपर्यंत आपले प्रश्न मांडण्याचे काम केले.त्यामुळे या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सरकारच्या माध्यमातून ईपीएस-९५ बद्दल ठोस निर्णय घेऊन पेंशन धारकांना दिलासा देईल अशी आशा देशातील दिड करोड वृध्द पेंशन धारकांना वाटत होती.परंतु याही अर्थसंकल्पीय अधिवेशनात ईपीएस-९५ पेंशन धारकांच्या पदरी निराशाच आली ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.अनेक वर्षांपासून पेंशन धारकांचा संघर्ष सुरूच आहे.लोकसभा निवडणुकीच्या आधी ईपीएस पेंशन धारकांबद्दल सरकारकडुन चांगली बातमी येण्याचे संकेत होते.परंतु सरकारने पेंशन धारकांच्या पदरी फक्त निराशा दिली.याचे दुःख करोडो वयोवृद्ध पेंशन धारकांना झाले.तरीही जगण्याइतकी पेंशन दिली पाहिजे याबद्दल अजून पर्यंत सरकारला जाग आलेला नाही.ईपीएस-९५ पेंशनचा मुद्दा कोणत्याही एका पक्षाचा,संघटनेचा किंवा संस्थेचा नसुन सार्वजनिक आहे. केंद्र सरकार मोठमोठ्या गोष्टी करत आहेत परंतु वृध्दांकडे पुर्णतः दुर्लक्ष करीत आहे. ईपीएस-९५ पेंशन धारकांना न्याय मिळेल या आशेने आतापर्यंत उम्मीद टीकुन होती.परंतु सरकार मिनिमम पेंशन बद्दल एकही शब्द बोलायला तयार नाही ही अत्यंत गंभीर बाब आहे. ईपीएस-९५ पेन्शन बद्दल सरकार सोबत,मंत्र्यांसोबत व अनेक खासदारांसोबत चर्चा होवून सुध्दा सरकार पेन्शन धारकांवर अन्याय करतांना दिसते याचे जिवंत उदाहरण या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिसून आले. आज देशातील दिड करोड ईपीएस-९५ पेन्शन धारकांना कमीत कमी १००० व जास्तीत जास्त ३००० रूपयापर्यंत पेन्शन मिळत असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह होणे अत्यंत कठीण झाले आहे.कारण सरकारने महागाईचा मोठा डोंगर उभा केला आहे यात सर्वसामान्य व पेंशन धारक दबलेला आहे.यामुळे अल्पशा पेन्शनमध्ये पेन्शन धारक जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही.कारण खाण्यापिण्याचा खर्च, इलेक्ट्रीक बिल, पाण्याचे बिल,घरटॅक्स,वाढती महागाई, वयानुसार औषधोपचार इत्यादी अती आवश्यक सेवा १००० किंवा ३००० रूपयात कशाकाय पुर्ण होणार? हे गांभीर्य सरकारला का दिसत नाही? सरकार एवढी निर्लज्ज का झाली?पेंशन धारकांची मागणी होती की, कमीत कमी ७ हजार ५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता व वैद्यकीय सुविधा मिळावी. परंतु वित्त मंत्री निर्मला सिताराम यांनी संपूर्ण ईपीएस-९५ पेंशन धारकांना निराश केल्याचे स्पष्ट दिसून येते.ईपीएस पेन्शन धारकांचा मुद्दा अत्यंत गंभीर, महत्त्वाचा आणि ज्वलंत असल्याचे मी समजतो. हा ज्वलंत मुद्दा असल्याने याची दखल केंद्र सरकारने या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेणे गरजेचे होते. परंतु सरकारने याला यत्किंचितही महत्व दिले नाही ही अत्यंत दुःखद बाब आहे. वृद्धांच्या अडीअडचणी पाहून ईपीएस- १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न मार्गी लावायला पाहिजे होता परंतु सरकारने पेंशन धारकांना निराश केले.केंद्र सरकारने आतापर्यंत दिड करोड ईपीएस पेन्शन धारकांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. तरीही ६० ते ८०वर्षाच्या म्हाताऱ्या पेन्शन धारकांनी आतापर्यंत शांततेने आंदोलन केले आणि करीत आहे व जगण्याइतकी पेंशनच्या मागणीची आस लावून बसले होते. कारण पेन्शन ही त्यांच्या म्हारपणाची शीदोरी आहे. त्यामुळे पेन्शन हे जीवन-मरणाचे साधन सुध्दा आहे.याबाबदची सुध्दा सरकारने जान ठेवली नाही. सरकारने पेन्शन धारकांचा अंत न पाहता कोणत्याही योजनेअंतर्गत कमीत कमी ७५०० रुपये पेन्शन, महागाई भत्ता आणि वैद्यकीय सुविधा ताबडतोब लागु करण्याचा निर्णय आतातरी घ्यावा.आता पेन्शन धारकांच्या प्रश्नावर अंतिम निर्णय घेण्याची वेळ आली आहे.देशात अनेक कठीण प्रश्न आहेत यात दुमत नाही आणि सरकार यावर नेहमी तोडगा काढण्याचा प्रयत्न करीत असते.परंतु आज १४० कोटी जनता व राजकीय पुढारी उघडल्या डोळ्यांनी दिड कोटी पेन्शन धारकांच्या वेदना पाहात आहे व दिसत आहे.परंतु सरकार ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या बाबतीत चेहऱ्यावर पांघरूण घेऊन बसले आहे.सरकारच्या तिजोरीत कामगारांच्या घामाचा अरबो रूपया सरकारजवळ आहे हा पैसा सरकार लोकप्रतिनिधीच्या पगारासाठी,पेन्शनसाठी व इतरत्र वापरत असतो. परंतु सरकार कामगारांना पेन्शन देवतांना भिक दील्यासारखी पेंशन देत आहे. ही लोकशाहीला काळीमा फासणारी व घृणास्पद बाब आहे.याचे दु:ख आपल्या पुर्वजांना सुध्दा होत असावे.राजकीय पुढाऱ्यांचे वाढीव पगार,इतर भत्ते व पेन्शन सुरळीत सुरू असतात व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वाढले की राजकीय पुढाऱ्यांचे पगार व पेंशन वाढतात याला काय म्हणावे?पेंशन धारकांच्या या घटनेवरून असे दिसुन येते की सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटत आहे. केंद्र सरकार पेन्शन धारकांना वाचवीण्यापेक्षा वाऱ्यावर सोडल्याचे काम करीत आहे. परंतु आताही वेळ गेलेली नाही देर आज दुरूस्त आए ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या मागणीवर सरकारने गांभीर्याने विचार करून अवश्य अंतीम निर्णय घेवून पेन्शन धारकांना दीलासा देवुन त्यांचा मार्ग मोकळा करावा. कारण ईपीएस-९५ पेन्शन धारक प्रत्येक अधिवेशनात पेन्शन वाढण्याची वाट पाहत असतो.परंतु नेहमी त्यांच्या नशिबी नीराशा लागते. ईपीएस पेन्शन धारकांनी गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत अनेक आंदोलने करून रस्त्यावर उतरले. तरीही सरकारचे डोळे उघडले नाही. म्हणजेच केंद्र सरकार ईपीएस-१९९५ पेन्शन धारकांबद्दल उदासीन असल्याचे दिसून येते. अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थमंत्री निर्मला सीतारामन ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांच्या जखमेवर फुंकर घालेल असे वाटत होते.परंतु सरकारने पेन्शन धारकांना वाऱ्यावर सोडले व निराशा हाती आली. ईपीएफओ चा पैसा हा राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रात जात असतो. त्यामुळे ईपीएस-१९९५ च्या पेन्शन धारकांना न्याय देण्याचे काम व दायीत्व केंद्र सरकारचे असते तेवढेच राज्य सरकारचे सुध्दा असते. कारण देशाच्या विकासाकरिता संपूर्ण पैसा हा राज्य सरकारच्या तिजोरीतुन केंद्रात जात असतो.त्यामुळे कामगार व कर्मचाऱ्यांचा ईपीएफओने घेतलेला पैसा गेला कुठे? असाही प्रश्न दिड करोड पेन्शन धारकांपुढे उपस्थित आहे.त्यामुळे प्रत्येक राज्यातील कामगार व कर्मचारी विचारत आहे की पेन्शन करीता कापलेला पैसा गेला कुठे? ईपीएस १९९५ चे पेन्शन धारक आपल्या हक्काचा पैसा पेन्शनच्या स्वरूपात सरकारला मागत आहे.परंतु सरकार यावर मात्र मौन धारण केल्याचे दिसून येते. म्हणजेच आज पेन्शन धारकांची परीस्थिती अशी झाली आहे की आपलाच पैसा आपणच चोर. त्यामुळे ईपीएस १९९५ च्या पेन्शन धारकांसमोर प्रश्न आहे की जगावे की मरावेअशी गंभीर परिस्थिती आज ईपीएस पेन्शन धारकांची झाली आहे.त्यामुळे सरकारने ईपीएस पेन्शन धारकांना कमीत कमी ७५०० रूपये पेन्शन, महागाई भत्ता व इतर सुविधा लागू करून पेन्शन धारकांना योग्य न्याय सरकारने द्यावा. पेंशनधारक आशावादी आहेत. त्यामुळे पेन्शन धारकांना विश्वास आहे की ईपीएस १९९५ पेन्शन धारकांचा प्रश्न अवश्य सुटेल. पेंशन धारकांची ही लढाई अंतिम आहे. ईपीएस पेन्शन धारक चिंतेने मरत आहे, महागाई वाढत आहे, आर्थिक परिस्थिती नाजूक होत आहे.सुप्रिम कोर्टाचेही म्हणने आहे की ईपीएस पेन्शन धारकांना मीळणारी पेन्शन ही तुटपुंजी आहे.त्यामुळे जगण्याइतकी पेन्शन मिळायलाच पाहिजे. शेतकरी हा ज्याप्रमाने देशाचा अन्नदाता आहे त्याचप्रमाणे देशाचा कामगार हा शिल्पकार आहे याची जाण केंद्र सरकारने ठेवली पाहिजे.राजकीय पुढारी मोठ्या ऐटीने सांगतात की समान हक्क,समान न्याय, समान अधिकार मग ईपीएस पेन्शन धारकांच्या पेन्शनमध्ये व राजकीय पुढाऱ्यांच्या पेन्शन, पगार यात तफावत का? असाही प्रश्न सर्वसामान्यांसमोर उपस्थित होतो.केंद्र सरकारने ज्याप्रमाणे आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी दिली.त्याचप्रमाणे ईपीएस-९५ पेंशन बद्दल सरकारने ठोस निर्णय घेतला पाहिजे. मी केंद्र सरकारला विनंती करतो की आपण अनेक योजना अंमलात आणल्यात त्याचे मनापासून स्वागत. परंतु २०१४ पासून प्रलंबित असलेला व लोकसभेत पक्ष-विपक्षाच्या अनेकदा खासदारांनी उचललेला ईपीएस-९५ चा पेंशनचा मुद्दाला गांभीर्याने घेऊन कमीत कमी ७५०० रूपये पेंशन जाहीर करून अवश्य मार्गी लावेल अशी आशा देशाच्या दिड करोड पेंशन धारकांना आहे. सरकारला यावर काहीच निर्णय घ्यायचा नसेल ईपीएस पेंशन धारकांना सरकारने स्वेच्छा मरणाची परवानगी द्यावी याचेही आम्ही स्वागत करू.जय हिंद!जय भारत.

**लेखक.**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्यांना गोरगरिबांचे दुःख, वेदना कश्या कळणार

## काटगाव येथील जाहीर सभेत भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे प्रतिपादन

लातूर – सत्तेतून पैसा आणि पैशातून सत्ता मिळवणाऱ्या कॉंग्रेस पुढाऱ्यांनी सत्ता मिळाल्यानंतर पर्यटनासारखे मतदार संघात येत राहिले. त्यांनी ग्रामीण भागाच्या विकासाचे प्रश्न सोडवले नाहीत, सर्व सामान्यांना न्याय दिला नाही. सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मलेल्यांना सर्वसामान्य जनतेचे दुःख आणि वेदना कळतील तरी कशा असा प्रश्न उपस्थित करून शेतकरी, महिला यांच्यासह सर्वच घटकांना आधार देणाऱ्या भाजपाला आशीर्वाद द्यावेत असे आवाहन भाजपाचे नेते आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी केले.

भाजपाचे काटगाव जिप गटातील उमेदवार सौ. पूर्वादेवी नाथसिंह देशमुख, काडगाव पंस गणातील उमेदवार सौ. शितल दत्तात्रय लटपटे आणि गातेगाव पंस गटातील उमेदवार समाधान जगन्नाथ पवार यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी सायंकाळी काटगाव येथे जाहीर सभा झाली या सभेस तिन्ही उमेदवारांसह जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख, भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, प्रभुभाऊ हावळ, प्रताप पाटील, गोपाळ पाटील, शरद शिंदे, अभिजीत पाटील, शंकर चव्हाण, प्रशांत पाटील, चंद्रकांत बोराडे, विष्णू पोहेरगावकर, ज्ञानेश्वर जुगल, ईश्वर बुलबुले, श्रीकांत बोराडे, हनुमंत कापरे, किशनराव लोमटे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड यांचे काटगाव येथे आगमन होताच फटाक्याची आतिषबाजी करून विविध वाजंत्रीच्या गजरात जोरदार स्वागत करण्यात आले.



या जाहीर सभेत बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, वर्षानुवर्ष संघर्ष करून शेतकरी, गोरगरीबांना न्याय मिळवून दिला आमदार झाल्यानंतर सर्वसामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम केले. गावा गावात विकासाच्या विविध योजना आणून विकास काय असतो हे दाखवून दिल्याने एके काळी ज्या गावात रमेश कराडला बसायला सतरंजी मिळत नव्हती त्या गावात आज जेसीबीने फुले उधळी जात आहेत हेच कॉंग्रेसवाल्याच्या पोटात दुखतंय मात्र हे सहज घडले नाही.

गुत्तेदारी करण्यासाठी आणि कमिशन खाण्यासाठी भाजपचे आमदार झाले असा आरोप करणाऱ्या कॉंग्रेस आमदाराचा समाचार घेताना भाजपा नेते आ. कराड म्हणाले की, लातूर शहरात विलासरावजींच्या नावाने होत असलेल्या रस्त्याचे कमिशन कोणी खाल्ले, गटार योजना, शादी खाना यासह अनेक विकास कामात कोणी कमिशन घेतले असा थेट आरोप करून मी जर एक रुपया खाल्ला असेल तर सिद्ध करा मी माझ्या आमदारकीचा आज राजीनामा देईल असे सांगून तुमची कुंडली जर बाहेर काढली तर पळता भुई थोडी होईल असे बोलून दाखविले.

भाजपा सरकारच्या माध्यमातून जिल्ह्यात हजारो कोटी रुपयांचे रस्त्याचे काम झाले या कामाचे श्रेय लाटण्यासाठी हातात खुळखुळा घेऊन कॉंग्रेसच्या आमदारानीच रस्त्याची कामे केली असे सभेतून सांगताहेत हे दुर्दैवी असून तुमच्या एका मताने विधानसभा निवडणुकीत दहशत मोडीत निघाली मला साथ द्या साखर कारखान्यातील मक्तेदारी संपुष्टात आणल्याशिवाय राहणार नाही असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, मांजराच्या दारात आंदोलन केल्याने गेटकींचा ऊस बंद झाला, एफआरपी प्रमाणे भाव मिळू लागला, आवाज उठवताच शेतकऱ्यांना पाचट कपातीचे पैसे मिळाले. बाहेरच्या काट्यावरील वजन केलेली उसाची गाडी कारखान्याच्या आत घ्यावी, जोपर्यंत कारखान्यावर शेतकऱ्यांना सन्मानाची वागणूक मिळणार नाही. तोपर्यंत माझा संघर्ष चालूच राहील असे बोलून दाखवले.

लातूर जिल्हा परिषदेवर आणि लातूर पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकणार हे सूर्यप्रकाशाइतके सत्य असून केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना कायमस्वरूपी सुरू ठेवण्यासाठी काटगाव जिल्हा परिषदेच्या आणि दोन्ही पंचायत समितीच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे आणि आपल्या भागाच्या परिसराच्या विकासाला गती द्यावी असेही आव्हान आ. रमेशआप्पा कराड यांनी केले. या सभेत बोलताना नाथसिंह देशमुख यांनी भाजपाच्या उमेदवारांना विजयी करा निश्चितपणे त्यांच्या हातून जनतेची सेवा करण्याचे पुण्य घडणार असल्याचे बोलून दाखविले. तर भाजपाचे भागवत सोट, पूर्वाताई देशमुख, शीतल लटपटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले तर गोपाळ पाटील यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विकास कामाची माहिती दिली. सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी प्रशांत पाटील यांनी आभार मानले.

या सभेला अमर शिंदे, श्रीराम साळुंके, सचिन लटपटे, प्रशांत शिंदे, रमेश लहाडे, सुधाकर कराड, प्रल्हाद बोराडे, आकाश लोखंडे, प्रभाकर माळी, हनुमंत बोराडे, बाळकृष्ण बोळे, अमोल बोराडे, विशाल शिंदे, अच्युत बोराडे, सरदार पठाण, सुरज बोराडे, शिवाप्पा हलकुडे, गणेश कापसे, नाना सूर्यवंशी, शिवराज हलकुडे, नरसिंग ढमाले, श्रीधर जाधव, भागवत बंडे, खंडू बोराडे, वाहब देशमुख, हनुमंत नेवले, लाला हवळ, जिलानी शेख, मन्सूर पठाण, नामदेव गायकवाड, जनार्दन काळे यांच्यासह काटगाव आणि परिसरातील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिवसेना सामाजिक न्याय विभागात लक्ष्मण वाघमारे यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती, मराठवाडा कार्यक्षेत्राची जबाबदारी; सामाजिक न्याय चळवळीला बळ

केज/प्रतिनिधी–शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सामाजिक न्यायाच्या चळवळीला अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने शिवसेना सामाजिक न्याय विभागाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष तथा आमदार मा.राम पंडागळे यांनी श्री.लक्ष्मण म. वाघमारे यांची उपाध्यक्ष (महाराष्ट्र राज्य) या पदावर एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती जाहीर केली आहे. या नियुक्तीपत्राचा दिनांक २२ जानेवारी २०२६ असा आहे. वाघमारे यांच्याकडे मराठवाडा विभागाचे कार्यक्षेत्र सोपवण्यात आले आहे.

शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे मुख्य उद्दिष्ट समाजातील गरजू, वंचित, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक तसेच दुर्बल घटकांना वेळेवर मदत, न्याय व मार्गदर्शन मिळवून देणे हे आहे. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी लक्ष्मण वाघमारे यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने व जबाबदारीने कार्य करावे, अशी अपेक्षा नियुक्तिपत्राद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.



मराठवाडा हा सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या अनेक आव्हानांना सामोरे जाणारा विभाग आहे. अशा परिस्थितीत सामाजिक न्याय विभागाचे उपाध्यक्ष म्हणून लक्ष्मण वाघमारे यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणार आहे. जनतेशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेणे, शासनाच्या योजना तळागाळात पोहोचवणे, तसेच अन्यायग्रस्त घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनात्मक पातळीवर सक्रिय काम करणे, अशी जबाबदारी त्यांच्यावर असेल.

या नियुक्तीमुळे मराठवाड्यात शिवसेनेच्या सामाजिक न्याय विभागाचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. संघटन मजबूत करण्यासोबतच सामाजिक प्रश्नांवर ठाम भूमिका घेऊन वाघमारे यांचे कार्य विभागाला नवी दिशा देईल, अशी अपेक्षा शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांमधून व्यक्त होत आहे.

आमदार राम पंडागळे यांनी नियुक्तिपत्रात नमूद केले आहे की, लक्ष्मण वाघमारे यांच्या कार्यामुळे शिवसेनेचा सामाजिक न्याय विभाग अधिक सक्षम व प्रभावी बनेल. सामाजिक बांधिलकी जपत, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची परंपरा शिवसेनेची असून, वाघमारे ही परंपरा पुढे नेतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या नियुक्तीबद्दल मराठवाडा विभागातील शिवसैनिक, सामाजिक कार्यकर्ते व विविध स्तरातून लक्ष्मण वाघमारे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या माध्यमातून सामाजिक न्यायाच्या लढ्याला अधिक बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## केज नगरपंचायत मधील प्रधानमंत्री आवास योजनेतील घोटाळा प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा–माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांची मागणी

केज/प्रतिनिधी केज नगरपंचायत मधीलपंतप्रधान आवास योजना (शहरी)' अंतर्गत ३ कोटी ६० लाख रुपयांचा महाघोटाळा झाल्याचा गंभीर प्रकार चौकशी समिती कडून उघड झाला आहे. या गैरव्यवहार प्रकरणातील अधिकारी पदाधिकारी यांसह सर्व दोषींवर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे.



गोरगरिबांचे घरे गिळंकृत केली गेली. या प्रकरणावर आदित्य पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे.

या प्रकरणातील दोषी अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून अपहार झालेली पूर्ण रक्कम लाभार्थ्यांना मिळावी.दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करावी अशी मागणी केज नगरपंचायतचे माजी नगराध्यक्ष आदित्य पाटील यांनी केली आहे.

पंतप्रधान आवास योजनेतून गोरगरिबांना टप्प्याटप्प्याने आर्थिक सहाय्य देण्यात येते. मात्र केज नगरपंचायतीमध्ये हा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्याऐवजी बनावट नोंदी, खोटी कागदपत्रे आणि संगणकीय हेराफेरी करून शेकडो पात्र लाभार्थ्यांना अद्याप संपूर्ण रक्कम मिळालेली नसताना निधी मात्र पूर्णपणे उचलल्याचे उघड झाले.

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत गरीब व गरजू नागरिकांसाठी देण्यात येणाऱ्या निधीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. सदर अहवालात शासकीय निधीचा चुकीचा वापर अशा गंभीर बाबी समोर आल्या आहेत.

आमच्या कार्यकाळात गरिबांना घरे उपलब्ध करून दिली.मात्र नंतरच्या काळात असे गंभीर प्रकार घडताहेत ही संतापजनक बाब आहे.

या प्रकरणी आदित्य पाटील यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, गरीबांच्या घरांसाठी असलेली योजना काही मोजक्या भ्रष्ट लोकांसाठी कमाईचे साधन बनली आहे. हा केवळ आर्थिक गैरव्यवहार नसून, गरिबांच्या हक्कांवरचा घाला आहे. अशा तीव्र संतापजनक भावना आदित्य पाटील यांनी व्यक्त केल्या आहेत.

## कै.रसिका महाविद्यालयाच्या रासेयो शिबीराचा समारोप

देवणी : दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी कै.रसिका महाविद्यालयाच्या रासेयोच्या विशेष वार्षिक शिबिराचा समारोप कार्यक्रम संगम येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत जावळे उपस्थित होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून स्वारातीम विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. विष्णू पवार उपस्थित होते त्यांनी पर्यावरण आणि मतदार जनजागृती करणे हे राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांचे महत्वाची काम आहे तसेच शिवाजीराजे महाविद्यालय उदगीर येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. बालाजी सूर्यवंशी हे उपस्थित होते त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतील युवकांची भूमिका स्पष्ट केली तसेच त्यांनी सादर केलेल्या माय ,




फुलपाखरू, हे गांधीजी या कविता कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. धनराज बिरादार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पुरुषोत्तम मोरे यांनी केले तर आभार डॉ. गोपाल सोमानी यांनी मानले या नंतर राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासाची शपथ प्रा डॉ.पुरुषोत्तम मोरे यांनी दिली. यावेळी गावच्या सरपंच सौ.राजाबाई रेवन आप्पा पाटील, गावातील नागरिक सुधाकर पाटील, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका एम.एम म्हेत्रे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. महादेव टेंकाळे एनएसएस प्रतिनिधी कारभारी सुजाता व एजास शेख, सहकार्यक्रमाधिकारी प्रा. शुभम जाधव, राधिका गरिबे यांच्यासह स्वयंसेवक स्वयंसेविका उपस्थित होते.

## चौथी आणि सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेकरीता नोंदणी आणि आवेदनपत्रासाठी १३ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

मुंबई–राज्यात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ४ थी) आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ७ वी) दि. २६ एप्रिल २०२६ रोजी एकाच दिवशी आयोजित करण्यात आली आहे. या परीक्षेकरीता शाळा नोंदणी आणि विद्यार्थी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता १३ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत असल्याचे परीक्षा परिषदेमार्फत कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे विद्या गुरुणां गुरुः ।

सुधारित वेळापत्रकानुसार शाळा माहिती प्रपत्र, आवेदनपत्र आणि शुल्क ऑनलाईन भरण्यासाठी नियमित शुल्कासह १३ फेब्रुवारी, विलंब शुल्कासह १४ ते २० फेब्रुवारी, अतिविलंब शुल्कासह २१ ते २४ फेब्रुवारी तर अति विशेष विलंब शुल्कासह २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. २८ फेब्रुवारी २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नसल्याचे परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

# काँग्रेसवाल्यांना नेत्याच्या प्रतिष्ठेसाठी तर भाजपाला जनतेच्या हितासाठी मते हवीत






लातूर – काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत जातीपातीचे, आडवा आणि जिरवाचे राजकारण केले, आम्ही केवळ गोरगरीब सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी विकासाचे राजकारण करीत आहोत, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकीत काँग्रेसवाले नेत्याच्या प्रतिष्ठेसाठी आणि आम्ही जनतेच्या हितासाठी, न्याय हक्कासाठी मत मागत आहोत. तेंव्हा आजपर्यंत केलेल्या विकास कामाच्या आधारावर भाजपाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

निवळी जिल्हा परिषद मतदार संघातील भाजपाच्या उमेदवार कु. मयुरी श्रीराम आदमाने निवळी पंस गणातील उमेदवार सूर्यकांत भिवा सोनवणे आणि चिंचोली (ब) पंस गणातील उमेदवार रेखा श्रीकांत देशमाने यांच्या प्रचारार्थ भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी सोमवारी निवळी, बोरगाव काळे आणि शिराळा येथे मतदारांच्या जाहीर बैठका घेतल्या. या प्रचार बैठकीस मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याप्रसंगी तिन्ही उमेदवारासह भाजपा किसान मोर्चाचे विक्रमकाका शिंदे, मंडल अध्यक्ष सूरज शिंदे, विश्वास कावळे, विनायक मगर, बालाजी दुटाळ, बाळासाहेब देशमुख, काशिनाथ ढगे, सचिन देशमुख, अभय सोनपेठकर, बाबासाहेब देशमुख, अरविंद पारवे, प्रशांत साखरे, बापू काळे, बिभीषण मायंदे, सचिन सवई, राजाभाऊ शिंदे, उद्धव मायंदे, रामलिंग विभुते यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

गेल्या पन्नास वर्षापासून या भागाचे नेतृत्व काँग्रेसने केले आठरा पगड जाती धर्मासाठी ग्रामीण भागाच्या विकासासाठी सत्तेच्या काळात काय केले याचा हिशोब काँग्रेसवाल्यांनी अगोदर द्यावा नंतर दुसऱ्यावर आरोप करावेत. गेल्या चार-पाच वर्षात काँग्रेसवाल्यापेक्षा कितीतरी पटीने विकासाची कामे केली असल्याचे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, निवळी येथील ग्रामदैवत श्री निळकंठेश्वर मंदिराच्या विकासासाठी काँग्रेसवाल्यांनी कधी पाच दहा लाख रुपये सुध्दा दिले नाहीत मात्र आम्ही तब्बल दोन कोटीचा निधी दिला असून आज काम सुरू आहे या कामासाठी आणखी तीन कोटीचा प्रस्ताव मंजुरीस्तरावर असून निवळी गावासह मतदार संघातील गावागावात लाखो नव्हे तर कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून विकास काय असतो हे दाखवून दिले. शासनाच्या विविध योजनेचा असंख्य गरजू लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्याचे काम केले.

ऊसाच्या टिपऱ्याचे राजकारण करून काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत शेतकऱ्यांना आडवा आणि जिरवाची भूमिका घेतली. ऊसाच्या वजनात काटा मारून शेतकऱ्याचे रक्तपिण्याची त्यांना सवय लागली असून शेतकऱ्यांनो भिऊ नका, घाबरू नका, निर्भय बना, साथ द्या. अन्यायाविरुद्ध लढण्यास मी तयार आहे असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर जिल्हा परिषदेवर आणि लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकणार हे सूर्यप्रकाशा इतके सत्य आहे. निवळी मतदार संघातून भाजपाच्या वतीने उच्च सुशिक्षित कु. मयुरी आदमाने यांना उमेदवार दिली त्या महाराष्ट्रातील सर्वात तरुण उमेदवार आहेत. ग्रामीण प्रश्नाची गरीबांची जाण असलेल्या या मतदारसंघातील तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करून आपल्या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी आशीर्वाद द्यावेत असे आवाहन केले.

प्रारंभी भाजपाचे मंडल अध्यक्ष सुरज शिंदे यांनी आ. रमेशआप्पा कराड आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची यादी सांगून काँग्रेसच्या अपप्रचाराला भूलथापांना बळी न पडता विकासाच्या प्रवाहात सोबत राहून मतदारांनी भाजपाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले. उमेदवार कु. मयुरी आदमाने यांनी आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात ग्रामीण भागाच्या विकासासाठी निश्चितपणे अहोरात्र मेहनत घेऊ मतदारांच्या विश्वासाला कदापि तडा जाऊ देणार नाही अशी ग्वाही दिली.

ठिक ठिकाणच्या सभेस मल्हारी शिरसाट, बाळू देशमुख, चैतन्य देशमुख, सहदेव ढोकळे, रमेश काळे, राजाभाऊ शिरसाठ, धनंजय काळे, अलीम सय्यद, व्यंकट शिरसाट, जनाबाई साखरे, गौतम राऊत, अल्ताफ तांबोळी, बालासाहेब महाराज, बबन काळे या प्रमुख कार्यकर्त्यांसह त्या त्या गावातील मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आज शिवजयंती उत्सव २०२६ निमित्त शांतता कमिटी बैठकीचे आयोजन-पो.नि.स्वप्निल उनवणे



केज/प्रतिनिधी-केज पोलीस ठाणे येथे आज बुधवार रोजी शिवजयंती उत्सव २०२६ निमित्त शांतता कमिटी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे तरी केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी,कार्यकर्ते, शिवप्रेमी,पत्रकार बांधव यांनी उपस्थित रहावे असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी केले आहे. बुधवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी ठीक १२-०० वाजता केज पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक वेंकटराम यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवजयंती उत्सव २०२६ च्या अनुषंगाने शांतता कमिटी सदस्य, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, सचिव, पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार बांधव आणि सर्व विभागाचे शासकीय अधिकारी यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या शांतता कमिटीच्या बैठकीस केज पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष,सचिव, पदाधिकारी,कार्यकर्ते, शिवप्रेमी, पत्रकार बांधव यांनी उपस्थित राहावे असे आवाहन केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे यांनी केले आहे.

## समता सैनिक दलाचे राजाराम साबळे व विलास आल्टे भीम युद्ध पुरस्काराने सन्मानित



नांदेड :- २० मार्च १९२७ रोजी बोधिसत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतः स्थापित केलेले आणि समता सैनिक दलाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष आद. डॉ. भीमराव साहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वामध्ये संपूर्ण भारतात मोठ्या जोमाने कार्यरत आहे. पण लातूर जिल्ह्यामध्ये समता सैनिक दलाची पोकळी भरून काढण्यासाठी भारतीय सेनेतून सेवानिवृत्त झाल्यानंतर गेल्या २५ वर्षापासून सतत प्रयत्न करून आज लातूर जिल्ह्यामध्ये ५०० समता सैनिकाची फौज ज्यांच्या प्रयत्नातून निर्माण झाली आहे. असे असिस्टंट लेफ्टनंट जनरल म्हणून समता सैनिक दलाच्या केंद्रीय स्तरावर कार्यरत असणारे राजाराम दादाराव साबळे व गेल्या २० वर्षापासून समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी सतत धडपड करणारे डिव्हिजन ऑफिसर म्हणून विभागीय पातळीवर कार्यरत असणारे विलास निवृत्तीराव आल्टे यांच्या कार्याची दखल घेऊन बुद्ध कीर्ती चॅरिटेबल ट्रस्ट, नांदेड च्या वतीने भीमा कोरेगाव शौर्य दिन व प्रजासत्ताक दिनाची औचित्य साधून *भीम योद्धा २०२६* या पुरस्काराने दिनांक ३१ जानेवारी २०२६ रोजी माता रमाई आंबेडकर बुद्ध विहार सहयोग नगर, नांदेड येथे सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला पूज्य भिक्खू शीलरत्न थेरो, सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगरचे कार्यकारी अभियंता इंजि. अशोकराव येरेकर, भारतीय बौद्ध महासभा राज्य शाखा हिशोब तपासणी युवराज मोरे, समता सैनिक दल मेजर जनरल सुरेश गजभारे, ट्रस्टचे अध्यक्ष बौद्धाचार्य रमेश कोकरे, उपाध्यक्ष तथा नगरसेवक रावसाहेब गायकवाड, सचिव राजेश बिऱ्हाडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आला. भीम योद्धा पुरस्कार मिळाल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक प्रा. बापूसाहेब गायकवाड, राज्य संघटक डी. एस. नरसिंगे महिला जिल्हाध्यक्ष शारदाताई हजारे, जिल्हा सरचिटणीस अभिमन्यू लामतुरे, कोषाध्यक्ष अर्जुन कांबळे, उपाध्यक्ष राजेंद्र क्षीरसागर, राजाभाऊ उबाळे, अजय गायकवाड अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.

## शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकटीकरणासाठी गोदरेज ग्रोव्हेटसोबतचा करार महत्वपूर्ण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस






मुंबई : महाराष्ट्रातील शेतकरी हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. शेतीवर अवलंबून असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक आहे. गोदरेज ग्रोव्हेटसोबतचा करार शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्याच्या राज्य शासनाच्या कटिबद्धतेचे प्रतीक असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील महिला शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली गोदरेज ग्रोव्हेट लिमिटेड आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएमउमेद) यांच्यात महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे राज्यातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील पाच हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत व आधुनिक शेती पद्धतींचे प्रशिक्षण मिळणार आहे.

महिला शेतकरी सक्षमीकरणाच्या दिशेने महत्वाचे पाऊल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील शेतकरी हे आपल्या राज्याचा कणा आहेत. हजारो कुटुंबांची उपजीविका शेतीवर अवलंबून असून, त्यातील अनेक कुटुंबांचे नेतृत्व कर्तृत्ववान महिला करत आहेत. अशा शेतकऱ्यांना सुलभ कर्ज आणि आवश्यक मदत वेळेवर मिळावी यासाठी शासन कटिबद्ध आहे. या पार्श्वभूमीवर गोदरेज ग्रोव्हेटसोबतची भागीदारी ही शाश्वत कृषी पद्धती आणि लैंगिक समावेशनाबाबत आमच्या बांधिलकीचे प्रतीक आहे. आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शेती पद्धतींच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विशेषतः महिला शेतकरी आत्मनिर्भर बनून राज्याच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देतील, यासाठी हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, महिला शेतकऱ्यांना वैज्ञानिक शेती पद्धती, बाजारपेठेतील संधी आणि माहितीपूर्ण निर्णयक्षमतेस सक्षम करून, हा उपक्रम महाराष्ट्रातील शेती उत्पादनक्षमता, उपजीविका आणि ग्रामीण टिकाऊपणा यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधण्याचा यशस्वी प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपक्रमाची व्याप्ती आणि उपयुक्तता-संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर हा तीन वर्षांचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नऊ कापूस उत्पादक जिल्ह्यांतील ५ हजारहून अधिक महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी गोदरेज ग्रोव्हेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या अंतर्गत महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) याबाबत प्रशिक्षण देण्यात येईल, ज्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे. राज्य शासन महिला शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, वैज्ञानिक मार्गदर्शन आणि बाजारपेठेशी जोडण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला शेतकरी वर्गाला सक्षमकरण्याच्या दिशेने हे निश्चितच एक महत्वपूर्ण पाऊल आहे.

ही तीन वर्षांची भागीदारी स्वयं-सहायता गट (एसएचजीएस) आणि महिला शेतकऱ्यांना चांगल्या कृषी पद्धती (जीएपी) आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन (आयपीएम) स्वीकारण्यासाठी प्रोत्साहित करेल, ज्यामुळे शेती उत्पादनक्षमता वाढून शाश्वत व सक्षम उपजीविका निर्माण होणार आहे.

५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट यांना उपक्रमाचा लाभ-या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नागपूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, परभणी, जळगाव, बीड, अकोला आणि नांदेड या नऊ जिल्ह्यांचा समावेश आहे. ५० हजार एकर क्षेत्रावर पाच हजारांहून अधिक महिला शेतकरी आणि १०० स्वयंसहायता गट या उपक्रमाचा लाभ घेणार आहेत. पुढील तीन वर्षांत हा उपक्रम ५०० हून अधिक स्वयंसहायता गटांपर्यंत विस्तारण्यात येणार आहे. तसेच कापसाबरोबरच मका व इतर पिक उत्पादक शेतकऱ्यांपर्यंतही हा उपक्रम पोहोचवण्याचा मानस आहे.

या कराराअंतर्गत एमएसआरएलएमउमेदकडून स्वयंसहायता गट व कृषी सखी नेटवर्कद्वारे महिला शेतकऱ्यांचे संघटन व समन्वय साधला जाणार आहे. तर गोदरेज ग्रोव्हेटकडून प्रशिक्षण कार्यशाळा, प्रात्यक्षिक शेतजमिनी, शेतकरी क्षेत्रशाळा व सुरक्षितता किट्स पुरवण्यात येणार आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत, गोदरेज ग्रोवेट आणि एमएसआरएलएम उमेद संयुक्तपणे जीएपी, आएपीएम आणि सुरक्षितता पद्धतींवरील प्रशिक्षण कार्यशाळा, शेतकरी क्षेत्रीय शाळा (त्रीशी क्रुऋश श्रव डल्हेश्री), प्रात्यक्षिक प्लॉट्स आणि सुरक्षितता किट्सचे वितरण करणार आहेत.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.